# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 08/10/2020 (गुरूवार)

(दुपार)

---

### दुखापत

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 10 कि. मी अंतरावर गोंडी दिग्रस येथे दिनांक 03/10/2020 चे 09:00 वा. ते 09.30 दरम्यान फिर्यादी नामे– सौ. उषा वामनराव वानखेडे, वय 50 वर्ष, रा. गोंडी दिग्रस यांची मुलगी घरासमोर उभी असतांना आरोपी क्रं 1) नंदकिशोर खोडके हा फिर्यादीच्या मुलीजवळ येवुन म्हणाला की, ''तु व तुझी आई माझ्या पत्नी सोबत नेहमी वादविवाद का करतात'' असे म्हणुन मुलीला शिविगाळ करीत होता. त्यामुळे फिर्यादीने आरोपीला हटकले असता आरोपी हा घरात धावत गेला व त्याचे घरातुन लोखंडी सळाक हातात घेवुन आला त्याच्या सोबत त्याची पत्नी आरोपी क्र. 2) ममता खोडके व 3) आई सिंधुबाई खोडके हया घरातुन बाहेर आल्या व शिविगाळ करून फिर्यादीला व तिच्या मुलीला पकडुन ठेवले व आरोपी क्र. 1 याने फिर्यादीच्या डोक्यावर व मुलीचा पायावर सळाख मारली. त्यामुळे फिर्यादी व तिची मुली जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 324, 323, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ प्रभाकर घोरमाडे पो स्टे कन्हान मो.नं. 9923121440 हे करीत आहे.

### शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. कुही :– फिर्यादी नामे– सौ. पुनम उमराव वैद्य, वय 21 वर्ष, रा. खरबी ता. कुही व आरोपी नामे– 1) पति– ग्यानिवंत उमराव वैद्य, वय 27 वर्ष, रा. खरबी ता. कुही हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत 07 कि.मी. अंतरावर मौजा खरबी येथे जुन 2019 दिनांक 06/10/2020 चे 22.00 वा. या दरम्यान आरोपीने फिर्यादीला लग्नानंतर तिच्या वडीलाकडे असलेली शेती विकण्यास लावून त्यापासुन मिळणारे पैसे घेवून ये. या कारणावरून आरोपी हा फिर्यादीला नेहमी शिवीगाळ करून मारपिट करून शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला. तसेच त्याच्यापासून तिच्या नवजात बाळाचे जिवाला धोका आहे. अशा तक्रारीवरून सदरचा गुन्हा नोंद. करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ),504,506,323 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा. नामदेव पुजारी 8956763319 हे करीत आहे.

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 8 कि. मी. मौजा साई नगर फेटरी दहेगाव येथे दिनांक 07/10/2020 चे 12.10 वा. ते 12.40 वा. दरम्यान आरोपी नामे– निलेश फत्तेजी गिर, वय 24 वर्ष, रा. छिंदवाडा(म.प्र) ह. मु. साई नगर दहेगाव हा स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात तलवार बाळगुन हस्तक्षेपनीय गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा बंडु कोकाटे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार बंडु कोकाटे 9822943605 हे करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील आसोली सावंगी गावाचे टर्निंग जवळ वर्धा रोड येथे दिनांक 07/10/2020 चे 17:30 वा. पुर्वी मृतक नामे– सतिश मेघश्याम नवघरे, वय 35 वर्ष, रा. वार्ड क्रं 7 टाकळघाट हा एमएच–40/एएफ–5413 क्रमांकाच्या मोटरसायकलने बोरी वरुन वर्धे कडे जात होते. त्यादरम्यान मागून येणारी एमएच–40/एक्यू–6443 क्रमांकाची एसटी बसचा चालक आरोपी नामे– मदन नामाजी राउत, वय 56 वर्ष, रा. यवतमाळ याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोर जाणाऱ्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक सतिश नवघरे हा गंभीर जखमी होवून त्याचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजू नत्थूजी नवघरे, वय 55 वर्षे, रा. टाकळघाट ता हिंगणा जि नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 448, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक भारती 9850974033 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर